# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:17.04.2025** **वार:गुरुवार**

१. अग्नेय आशियातली सर्वात मोठी वैमानिक प्रशिक्षण संस्था अमरावतीमध्ये सुरू होणार
२. राज्यातील प्रधानमंत्री किसान सम्मान योजनेच्या ७५ टक्के लाभार्थ्यांना ओळख क्रमांक
३. उत्तम आरोग्यासाठी रोज केळी खाण्याचा आरोग्यतज्ञांचा सल्ला
४. यंदाचा लता दीनानाथ मंगेशकर पुरस्कार कुमार मंगलम बिर्ला यांना जाहीर आणि
५. राज्यातल्या अनेक शहरांत कमाल तापमान चाळीशीपार

**<u>अमरावतीविमानतळ</u>**

अमरावती इथं सुरू केली जाणारी विमान उड्डाण प्रशिक्षण संस्था अग्नेय आशियातली सर्वात मोठी वैमानिक प्रशिक्षण संस्था ठरेल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. अमरावती विमानतळ आणि उडान अर्थात उडे देश का आम नागरिक योजनेअंतर्गत अमरावती मुंबई प्रवासी विमानसेवेचा काल प्रारंभ करताना ते बोलत होते. या विमानतळाच्या महत्त्वाबाबत मुख्यमंत्री म्हणाले,

**<u>साउंड बाइट मुख्यमंत्री</u>**

**<u>SCRIPT -</u>**

***या ठिकाणी जी पायलट ट्रेनिंग स्कूल सुरू होणार आहे ही याकरता महत्त्वाची आहे की या एका पायलट ट्रेनिंग स्कूल मुळे आपलं आपलं अमरावती हे जगाच्या नताशावर येत आहे कारण साऊथ ईस्ट एशिया मधली सगळ्यात मोठी पायलट ट्रेनिंग स्कूल ही अमरावतीमध्ये सुरू होती आहे आणि जवळपास दरवर्षी 180 पायलट ही अमरावतीमध्ये या ठिकाणी तयार होतील जवळपास 34 विमान या ठिकाणी पार्क असतील जी विमान या ठिकाणी ट्रेनिंग देतील आणि यातन केवळ पायलट तयार होतील इतक्या पुते मर्यादित नाही आहे अशा प्रकारची पायलट ट्रेनिंग स्कूल आल्यामुळे मोठ्या प्रमाणात इकॉनॉमिक ॲक्टिविटी सुरू होते अर्थव्यवस्थेला चालना मिळते वेगवेगळ्या पद्धतीने त्याचे इनडायरेक्ट बेनिफिट्स हे जॉब क्रिएशन मध्ये खूप मोठ्या प्रमाणात होतात म्हणून मला असं वाटतं की मोदी सरकारच्या कार्यकाळामध्ये आपल्याला मिळालेली एक खूप मोठी भेट आहे.***

गेल्या १० वर्षांत देशातल्या विमानतळांची संख्या, विमानं आणि हवाई वाहतूक मार्ग यांची संख्या जवळपास दुपट झाली आहे असं नागरी हवाई वाहतूक मंत्री के. राम मोहन नायडू, यांनी याप्रसंगी सांगितलं. तर २०१४ नंतर देशात ८६ नवीन विमानतळ सुरू झाल्याचं राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले.

**<u>शेतकरीअनुदान</u>**

शेतीविषयक विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीतून शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. अमरावती विभागातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना प्रातिनिधिक स्वरुपात सानुग्रह अनुदानाचे धनादेश मुख्यमंत्र्यांच्या हस्ते देण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. विदर्भात वर्ष २००६ ते २०१३ दरम्यान सरळ खरेदीनं झालेल्या भूसंपादनात जमिनीचा कमी मोबदला मिळालेल्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्यास मान्यता दिली असून हे अनुदान शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा केलं जाईल असं त्यांनी सांगितलं.

**<u>शेतकरीओळखक्रमांक-</u>**

राज्यातल्या शेतकऱ्यांना जमीन मालकीचा पुरावा तसंच ओळख क्रमांक देण्यासाठी ॲग्रिस्टॅक योजना राबवण्यात येत आहे. या योजनेचा आतापर्यंत ९१ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना लाभ झाला आहे. राज्यातील प्रधानमंत्री किसान सम्मान योजनेच्या ७५ टक्के लाभार्थ्यांना ओळख क्रमांक देण्यात आल्याची माहिती पुणे भूमी अभिलेख संचालक डॉक्टर सुहास दिवसे यांनी दिली. अहिल्यानगर जिल्ह्यात सर्वाधिक शेतकऱ्यांना ओळख क्रमांक दिले असून त्यानंतर पुणे जिल्ह्याचा क्रमांक आहे.

**<u>मध्यरेल्वे</u>**

मध्य रेल्वेनं मुंबई मनमाड पंचवटी एक्स्प्रेस गाडीत एटीएम यंत्र बसवलं आहे. चालत्या रेल्वेत एटीएमची सुविधा देण्याचा रेल्वेचा हा पहिलाच प्रयत्न आहे. या सुविधेच्या तांत्रिक व्यवहार्यतेचं मूल्यांकन केल्यानंतर इतर गाड्यांमध्येही ती बसवता येईल असं मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी स्वप्नील नीला यांनी आकाशवाणीला सांगितलं.

**<u>सरन्यायाधीशशिफारस</u>**

सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी देशाचे पुढचे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई यांच्या नावाची शिफारस केंद्रिय कायदा मंत्रालयाकडे केली आहे. न्यायमूर्ती गवई हे सर्वोच्च न्यायालयातले दुसऱ्या क्रमांकाचे वरीष्ठ न्यायमूर्ती आहेत. सध्याचे न्यायमूर्ती संजीव खन्ना यांचा कार्यकाळ पुढच्या महिन्याच्या १३ तारखेला संपणार आहे.

**<u>पोषणपंधरवडा</u>**

इंट्रो - केंद्र सरकारच्या महिला बालविकास मंत्रालयाच्या वतीनं देशात ७वा पोषण पंधरवडा राबवण्यात येत आहे. सांगली जिल्ह्यात राबवण्यात येत असलेल्या या मोहिमेसंदर्भात  बालविकास प्रकल्प अधिकारी पूजा कणसे म्हणाल्या...

स्थानिक पातळीवर कुपोषणाची समस्या ओळखून आणि शारीरिक दृष्ट्या सक्रिय व निरोगी राहण्यासाठी पालकांना विविध कार्यक्रमा द्वारे प्रोत्साहीत केले जात आहे. स्थन पान आणि पूरक आहाराचे महत्व पटून देणे यावर देखील भर दिला जात आहे. यावर्षीचा पोषण पंधरवडा हा कुपोषणाच्या समस्येवर मात करण्यासाठी एक महत्त्वाचा राष्ट्रीय स्तरावरील प्रयत्न असून विविध उपक्रम आणि कार्यक्रमा द्वारे सांगली जिल्ह्यातील सर्व प्रकल्प स्तरावर मोठ्या प्रमाणात साजरा केला जात आहे.

***SCRIPT***

***स्थानिक पातळीवर कुपोषणाची समस्या ओळखून आणि शारीरिक दृष्ट्या सक्रिय व निरोगी राहण्यासाठी पालकांना विविध कार्यक्रमा द्वारे प्रोत्साहीत केले जात आहे. स्थन पान आणि पूरक आहाराचे महत्व पटून देणे यावर देखील भर दिला जात आहे. यावर्षीचा पोषण पंधरवडा हा कुपोषणाच्या समस्येवर मात करण्यासाठी एक महत्त्वाचा राष्ट्रीय स्तरावरील प्रयत्न असून विविध उपक्रम आणि कार्यक्रमा द्वारे सांगली जिल्ह्यातील सर्व प्रकल्प स्तरावर मोठ्या प्रमाणात साजरा केला जात आहे.***

लातूर जिल्ह्यात विविध गावात पोषणाचं महत्व सांगण्यासाठी गरोदर मातांसह ग्रामस्थांना माहिती दिली जात आहे. साई गावातील ग्राम दरबारात १४ गरोदर मातांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

**व्हॉइसकास्टजागतिककेळीदिन-**

**Intro -**

अखिल भारतीय केळी उत्पादक महासंघाच्या वतीनं जळगाव जिल्ह्यातल्या रावेर इथं काल जागतिक केळी दिन साजरा करण्यात आला. केळ्यांमधल्या पोषणमूल्यांबाबत जागरूकता वाढून त्याचं सेवन वाढावं यासाठी केळी दिवस साजरा केला जातो...

***स्क्रिप्ट –***

***जागतिक केळी उत्पादनाच्या ३० टक्के केळ्यांचं उत्पादन भारतात होतं. मात्र भारतीयांमध्ये आवश्यक त्या प्रमाणात केळी खाल्ली जात नाही. सर्वांगीण दृष्टीनं विचार केल्यास केळी हे सहज उपलब्ध होणारं, पौष्टीक फळ असून, त्याचा आहारात रोज समावेश केल्यास आरोग्य उत्तम राहिल असा सल्ला ज्येष्ठ कृषी तज्ज्ञ डॉ. के. बी. पाटील यांनी दिला. जागतिक स्तरावर केळ्यांना महत्वाचा अन्नघटक मानलं जातं. कुपोषण दूर करण्यासाठी, खेळाडूंना स्फूर्ति देण्यासाठी केळ्यांचा उपयोग होतो. दररोज ‘दोन केळी खा आणि निरोगी रहा’ हा आरोग्याचा मंत्र समजून घेतला पाहिजे, असं आवाहन पाटील यांनी जागतिक केळी दिनानिमित्त केलं.आकाशवाणी बातम्यांसाठी जळगावहून राजेश यावलकर यांच्यासह माधुरी कुलकर्णी पुणे.***

**पुरस्कार**

यंदाचा लता दीनानाथ मंगेशकर पुरस्कार आदित्य बिर्ला समूहाचे अध्यक्ष पद्मविभूषण पुरस्कारानं सन्मानित कुमार मंगलम बिर्ला यांना त्यांचं दूरदर्शी नेतृत्व आणि भारताच्या विकासाच्या गाथेत दिलेल्या योगदानासाठी जाहीर करण्यात आला आहे. मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्या ८३ व्या स्मृतिदिनी मुंबईत २४ एप्रिलला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांच्या हस्ते हा पुरस्कार दिला जाणार आहे. गुरु दीनानाथजींच्या समर्पण, उत्कृष्टता आणि सेवेच्या भावनेला मूर्त रूप देणाऱ्या व्यक्तिंना दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो. हा उत्सव

केवळ भूतकाळाला श्रद्धांजली नाही तर वर्तमान आणि भविष्याला दिलेली एक मशाल आहे, असं पंडित हृदयनाथ मंगेशकर यांनी पुरस्काराची घोषणा करताना काल मुंबईत सांगितलं.

**<u>उदयसामंत</u>**

बीड जिल्ह्यात राज्य शासनाचं पाचवं कौशल्य विकास केंद्र सुरू करणार असल्याची माहिती उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली. बीड जिल्हा गुंतवणूक परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते काल बोलत होते. या परिषदेच्या माध्यमातून स्थानिक उद्योजकांनी ९०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला असून यातून रोजगार निर्मिती होईल असं सामंत म्हणाले. धाराशिव इथंही काल जिल्हा गुंतवणूक परिषद आयोजित करण्यात आली होती. जिल्ह्यात उद्योगवाढीसाठी एक खिडकी योजना सुरु करणार असल्याचं जिल्हाधिकाऱ्यांनी परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी सांगितलं.

**<u>पंडितदीनदयाळउपाध्याय</u>**

राज्यात 22 ते 25 एप्रिल या कालावधीत पंडित दीनदयाळ उपाध्याय एकात्म मानवदर्शन हीरक महोत्सव राबवण्यात येणार आहे. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे मौलिक विचार समाजात रुजावेत या उद्देशानं हा महोत्सव साजरा होणार आहे अशी माहिती कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी काल मंत्रालयात एका बैठकीत दिली.

**<u>ससूनअहवाल</u>**

पुण्यातील दिनानाथ रुग्णालयात झालेल्या गर्भवती मृत्यू  प्रकरणात ससूनच्या सहा वैद्यकीय तज्ज्ञांच्या समितीकडून, ससून रुग्णालयाचे अधिष्ठाता एकनाथ पवार यांना अहवाल सादर करण्यात आला असून, पवार हा अहवाल सरकारला पाठवणार आहेत.

**<u>इस्रोभेट</u>**

नांदेड जिल्ह्यातल्या अनुसूचित जाती आणि नवबौद्धांसाठीच्या शासकीय निवासी शाळेतले ६० विद्यार्थी काल इस्रो भेटीसाठी रवाना झाले. माहूर, हदगाव, उमरी, नायगांव इथल्या शाळेतले हे विद्यार्थी हैदराबादमधून विमान प्रवास करुन श्रीहरीकोटा इथं पोहोचले. १९ एप्रिलपर्यंत या विद्यार्थ्यांचा हा अभ्यास दौरा असणार आहे.

**<u>रेल्वे</u>**

भारतीय रेल्वेनं १७२ गौरवशाली वर्षे पूर्ण केली आहेत. आशियाई उपखंडातील आणि भारतातील पहिली रेल्वे १६ एप्रिल १८५३ या दिवशी मुंबई आणि ठाणे दरम्यान धावली. कालांतरानं पहिली रेल्वे चालवणारी ग्रेट इंडियन पेनिन्सुला रेल्वे कंपनी १९०० मध्ये इंडियन मिडलँड रेल्वे कंपनीत विलीन झाली आणि दिल्ली, कानपूर, अलाहाबाद आणि नागपूर-रायचूरपर्यंत या सेवेचा विस्तार झाला. ५ नोव्हेंबर १९५१ यादिवशी निजाम राज्य, सिंधिया राज्य आणि धोलपूर राज्य रेल्वेचं एकत्रीकरण करून मध्य रेल्वेची स्थापना करण्यात आली. सध्या मध्य

रेल्वेचं मुंबई, भुसावळ, नागपूर, सोलापूर आणि पुणे या ५ विभागांसह महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि कर्नाटक या राज्यांमध्ये ४९२ स्थानकांसह ४ हजार ३२२ किलोमीटरचं जाळं आहे.

**पुरस्कार**

अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघातर्फे प्रकाशकांसाठी असलेल्या उत्कृष्ट ग्रंथनिमिर्ती पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. या वर्षी ९६ प्रकाशकांची ६३० पुस्तके प्रकाशक संघाला प्राप्त झाली होती. विविध विभागात पुण्यातल्या रोहन प्रकाशन, राजहंस, दिलीपराज , बुकगंगा पब्लिकेशन्स, यांच्यासह वर्णमुद्रा पब्लिशर्स-शेगाव. डिंपल पब्लिकेशन-मुंबई. शब्दालय पब्लिकेशन हाऊस -श्रीरामपूर, पंडित पब्लिकेशन्स- कणकवली, सप्तर्षी प्रकाशन-मंगळवेढा आदी प्रकाशन संस्थांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत दिल्ली कॅपिटल्सनं काल रात्री दिल्लीत झालेल्या थरारक सामन्यात राजस्थान रॉयल्सचा पराभव केला. दोन्ही संघांच्या धावा समान झाल्यानंतर सुपर ओव्हरमध्ये दिल्ली कॅपिटल्सनं बाजी मारली.

**हवामान**

राज्यात बहुतांश ठिकाणी उन्हाच्या झळांमध्ये वाढ झाली असून अनेक ठिकाणी कमाल तापमानानं चाळीशी ओलांडली आहे. राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान अकोल्यात ४३ पूर्णांक ७ दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. पुण्यासह सातारा, कोल्हापूर, सांगली, सोलापूर, मालेगांव, अहिल्यानगर, जळगांव तसंच मराठवाडा आणि विदर्भात अनेक ठिकाणी कमाल तापमान ४० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त होतं.

आज मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट हवामान राहील. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात हवामान कोरडं तर मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**